महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शुक्रवार ❖ ०४ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १०१ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



दुसरी माळ : श्री ब्रह्मचारिणी

# महाविकास आघाडीचं जागा वाटप ठरलं ?

## बहुतांश उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब

## ठाकरेंना १०० जागा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीत जागावाटपाच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चांमध्ये बहुतांश उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. महाविकास आघाडीचं जागावाटप शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांत होत आहे. तर महायुतीचा जागावाटपाचा फॉर्मुला निश्चित करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्राचे दौरे करत आहेत. या जागावाटपात महाविकास आघाडीतून महत्वाची बातमी समोर आली आहे. मविआत बहुतांश जागांचा तिढा सुटला आहे. उद्धव ठाकरे गट राज्यातीस १०० जागांवर उमेदवार देणार असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी जवळपास २३ मतदारसंघांचा तिढा मिटवण्यात आघाडीला यश मिळालं आहे.

मुंबईतील जागावाटपात ठाकरे गटाचं वर्चस्व दिसून आलं आहे. ठाकरे गटाला १३, काँग्रेसला ८ तर शरद पवार गट आणि समाजवादी पक्षाला एक जागा सोडण्यावर सहमती बनल्याची माहिती आहे. या व्यतिरिक्त बाकीच्या १३ जागांचा तिढाही लवकरच मिटेल असे सांगण्यात येत आहे. महाराष्ट्रातील विविध मतदारसंघात कुणाचा उमेदवार राहिल याचीही चर्चा बैठकीत झाली. ठाकरे गट राज्यातील १०० ते १०५ मतदारसंघात उमेदवार देण्याची शक्यता आहे. काँग्रेसलाही शंभरच्या आसपास जागा मिळण्याची शक्यता आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ८० जागा मिळतील अशी शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. त्याखालोखाल ठाकरे गटाचे उमेदवार निवडून आले होते. तरीही शरद पवार गटाचा स्टाईक रेट चांगला राहिला होता.

ठाकरे गटापेक्षा कमी जागा मिळाल्यानंतरही जास्त जागा निवडून आणता आल्या. असे असतानाही विधानसभा निवडणुकीत नवा फॉर्मुला राष्ट्रवादीकडून राबवला जात असल्याचे दिसत आहे. निवडून येण्याची क्षमता आणि उमेदवाराची ताकद या गोष्टींचा विचार करून शरद पवारांकडून जागांची निवड होत असल्याचे दिसत आहे. मुंबईत ठाकरे गटाची राजकीय ताकद जास्त आहे. नुकत्याच झालेल्या सिनेटच्या निवडणुकीत आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वातील युवासेनेने विजय मिळवल्याने ठाकरे गटाचा उत्साह वाढला आहे. येथे ठाकरे मोठ्या भावाच्या भूमिकेत दिसत आहत. त्यामुळे मुंबईतील जागांसाठी त्यांनी वेगळी रणनीती आखली आहे. मुंबईतील जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्यासाठी ठाकरे गट आग्रही आहे.

मुंबईतील वरळी, शिवडी, चेंबूर, कलिना, अंधेरी पूर्व, दिंडोशी, विक्रोळी, भांडुप पश्चिम मतदारसंघ ठाकरे गटाला मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला मुंबादेवी, धारावी, वांद्रे पश्चिम, मालाड पश्चिम, चांदिवली आणि कांदिवली पूर्व हे विधानसभा मतदारसंघ मिळतील अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### मुंबईत ठाकरे गट मोठा भाऊ

महाविकास आघाडीच्या नेत्यांची मुंबईतील जागांबाबत चर्चा सुरू आहेत. येथील ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी २३ जागांचा तिढा जवळपास मिटला आहे. या २३ पैकी ठाकरे गटाला १३, काँग्रेसला ८ तर शरद पवारगट आणि समाजवादी पक्षाला एक जागा सोडण्यावर सहमती बनल्याची माहिती आहे. बाकीच्या १३ जागांचा तिढाही लवकरच मिटेल असे सांगण्यात येत आहे. मुंबईतील घाटकोपर पूर्व मतदारसंघ शरद पवार गटाला तर शिवाजीनगर मतदारसंघ समाजवादी पार्टीला मिळण्याची शक्यता आहे.

# दोन आठवड्यांत आचारसंहितेचे संकेत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई - केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकताच राज?यातील विधानसभा निवडणूकीसाठीचा आढावा दौरा पुर्ण केला. या दौ-यात त?यांनी दिवाळीपूर्वी निवडणूका होणार असल?याचे संकेत दिले आहेत. दरम?यान, हरियानण आणि जम?मू-काश?मीवर विधानसभा निवडणूकीचा ८ ऑक्टोबरला निकाल जाहीर होणार आहे.

यानंतर १० ऑक्टोबरला या दोन्ही राज्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम संपेल. नियमानुसार एका निवडणुकीचा कार्यक्रम संपेपर्यंत दुसरी निवडणूक घोषित करता येत नाही. त्यामुळे राज?यात १३ ऑक्टोबरनंतर विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा होईल आणि त?याच दिवशीपासून आचारसंहिता लागू होणार असल?याची दाट शक?यता आहे.

महाराष्ट्रात नवी विधानसभा २६ नोव्हेंबर २०२४ रोजी अस्तित्वात यायला हवी. तत्पूर्वी निवडणुकीसाठी मतदान होऊन निकाल लागणे आवश?यक आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर ४५ दिवसांनी नवीन विधानसभा गठीत करावी लागते. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मतदान घ्यायचे ठरवले तर त्यासाठी ऑक्टोबरला १३ ते १६ या तारखांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करावी लागेल. त्यामुळे ४५ दिवसांनी राज्यात नवं सरकार येऊ शकते.

अलीकडेच विधानसभा निवडणूक वेळेवर होण्याचे संकेत केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले. राज्य विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे, त्यापूर्वी निवडणूक होईल. विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात घ्यावी, अशी मागणी शिंदे सेना आणि अजित पवार गटाने केली आहे. मात्र, निवडणूक किती टप्प्यात होईल, हे लवकरच सांगू, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणूकीची गेल?या काही महिन?यांपासूनच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. त?यात सध?या सर्वच राजकीय पक्षांमध?ये जागावाटपावरून रस?सीखेच सुरु आहे. यंदा सत?ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडी यांच?यात थेट लढत होणार आहे. मात्र, गेल?या काही वर्षांमध?ये घडलेल?या नाट्यमय राजकीय घटना आणि पक्षफुटीनंतर संपूर्ण राजकीय गणित बदलली आहे. यामुळे निवडणूकीतील विजयाबाबत दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

# १०० रुपयांचा मुद्रांक इतिहासजमा होणार


## सर्वसामान्य नागरिकांना आधिक भुर्दंड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : सरकारी दस्तावेज असो किंवा साधी नोटरी करायची असो, तसेच बँकेतून कर्ज घ्यायचे असो सर्वसाधारणपणे नागरिकांना किमान १०० रुपयांच्या स्टँप पेपवरुन दस्तावेज तयार करता येत होतो

१००, २०० आणि ५०० रुपयांच्या स्टैपवर नागरिकाचा दस्तावेज ग्राह्य धरला जात होता

मात्र, यापुढे १०० आणि २०० रुपयांचे स्टँप पेप इतिहासजमा होणार आहेत. कारण, आता किमान ५०० रुपयांच्या स्टॅपवरच खरेदी, नोटरी, हक्क किंवा प्रतित्रापत्र दिले जाणार आहे. राज्य सरकारने मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्यामुळे




महसूल विभागाकडून आता केवळ ५०० रुपमांचे स्टँप जारी केला जातील, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आधिक भुदैंड बसणार आहे. राज्य शासनाने सरकारचा महसूल वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे

तहसील किंवा महसूल कार्यलयात अवध्या शंभर, दोनशे रुपयांत स्टैप केले जात वैयक्तिक कारणांसह बैंक व विविध कामांसाठी केल्या जाणाऱ्या प्रतिज्ञापत्रासह साठेखतानंतरचे खरेदीखत, हक्क सोडपत्रासाठी आता पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क मोजावे लागणार आहे. स्थावर, जंगम मालमत्तेसाठीचा दस्तावेज

कंपन्यांच्या एकत्रीकरण, पुनर्रचना, विलिनीकरण तसेच विभागणीमध् ये वि?द्यमान किंवा अविष्यातील मतभेद मिटविताना लवादामार्फत लेखी निर्णय दिला जातो. कंपन्यांचे आगभांडवल मोठे असल्याने त्यांच्या स्थावर, जंगम मालमत्तेप्रकरणी अभिहस्तांतरणामध् ये सध्या पाचशे रुपये मुद्रांक शुल्क आकारणी होते. वाढीसाठी पाचशे रुपयांवरुन चल व अचल मालमत्तेच्या बाजारमूल्यप्रमाणे दर बदलले जातात. मात्र, सर्वसामान्य नागरिकांना १०० आणि २०० रुपयांच्या स्टैंप पेपरवर त्यांचे दस्तावेज तयार करता येत होते आता, त्यासाठी किमान

५०० रुपयांच्या स्टॅपवर दस्तावेजवर बनवावे लागणार आहेत,

# मराठी भाषेला अभिजात दर्जा

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**दै.. ठाणे जीवनदीप वार्ता**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे १४ कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे.

मराठीसह अन्य पाच भाषांना अभिजात दर्जा दिला आहे. यावर बोलताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, आतापर्यंत आपल्याकडे तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया या अधिसूचित अभिजात भाषा होत्या. अभिजात भाषांचे संवर्धन आणि संवर्धन करण्यासाठी आणि समृद्ध वारसा जपण्यासाठी सरकार अनेक पावले उचलत आहे. पंतप्रधान मोदींनी नेहमीच भारतीय भाषांवर लक्ष केंद्रित केले आहे. आज मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या ५ भाषांना अभिजात भाषा म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

# जिल्हयामध्ये सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ विशेष प्रतिनिधी**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद ठाणे यांच्यामार्फत पाणी गुणवत्ता सर्वेक्षण व सनियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण दि.०१ ऑक्टोबर, २०२४ पासून सुरू असून दि. ३१ ऑक्टोंबर, २०२४ या कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे. पाणी गुणवत्ता सर्वेक्षण व सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर असे वर्षातून दोन वेळा स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात येते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जल जीवन मिशन अतुल पारसकर यांनी हे सर्वेक्षण वेळेत पुर्ण करण्याचे आदेश आरोग्य विभागास दिले आहेत. सार्वजनिक स्त्रोतांच्या पिण्याच्या पाण्याचे स्वच्छता सर्वेक्षण ग्रामपंचायतीमधील जलसुरक्षक, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक यांच्यामार्फत हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी यांच्यावर या सर्वेक्षणाची जबाबदारी आहे. हे अत्यंत वैशिष्टपूर्ण सर्वेक्षण असून सर्वेक्षणाच्या निकषांनुसार तसेच स्त्रोतांच्या जोखीमेनुसार वर्गीकरण करून व ग्रामपंचायतींना लाल, हिरवे, पिवळे व चंदेरी कार्ड वितरीत करण्यात आहे.

**जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे ३ हजार २६१ स्त्रोत**

जिल्हयातील ४३१ ग्रामपंचायतीमधील ३ हजार २६१ सार्वजनिक स्त्रोत आहेत. त्यापैकी कल्याण तालुक्यात २००, भिवंडी तालुक्यात ८९०, अंबरनाथ तालुक्यात २३२, मुरबाड तालुक्यात ८१२, शहापूर तालुक्यात १ हजार १२७ पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची संख्या असून एकूण ३ हजार २६१ स्त्रोत ठाणे ग्रमीण भागात आहेत.

**लाल कार्ड :-** ग्रामपंचायतींमधील ७० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या तीव्र जोखमींच्या स्त्रोतांवर अवलंबून असल्यास त्या ग्रामपंचायतीला लाल कार्ड देण्यात यावे. ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये एका गावात जरी वरील निष्कर्ष आढळल्यास त्या ग्रामपंचायतीस संबंधित गावास लाल कार्ड देण्यात येते.

**हिरवे कार्ड:-** ग्रामपंचायतीमधील ७० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या कमी जोखमीच्या स्त्रोतांवर अवलंबून असल्यास त्या ग्रामपंचायतीला हिरवे कार्ड देण्यात येते.

**पिवळे कार्ड :-** ग्रामपंचायतीमधील ७० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या तीव्र जोखीम अथवा कमी जोखमीच्या स्त्रोतांवर अवलंबून नसल्यास त्या ग्रामपंचायतीस पिवळे कार्ड देण्यात येते. ग्रुप ग्रामपंचायतींमध्ये देखील एका गावात वरील निष्कर्ष आढळल्यास त्या ग्रामपंचायतीस संबंधित गावाचे नाव टाकून पिवळे कार्ड देण्यात येते.

**चंदेरी कार्ड :-** सलग पाच वर्षे साथीचा उद्रेक न झालेल्या व पाच वर्षे हिरवे कार्ड मिळालेल्या असे दोन्ही निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतीस चंदेरी कार्ड देण्यात येते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# ठाण्यात पंतप्रधानांच्या कार्यक्रमाची जय्यत तयारी

## ५ ऑक्टोंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घोडबंदर भागात मोठा कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाणे :** घोडबंदर येथील कासारवडवली भागातील वालावलकर मैदानात येत्या शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रम पार पडणार असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी ठाणे जिल्हा प्रशासन आणि ठाणे महापालिकेमार्फत सुरू आहे. याठिकाणी ४० हजारांच्या आसपास नागरिक बसू शकतील, असा भव्य मंडप उभारण्यात आलेला आहे. याशिवाय, मैदानापासून काही अंतरावरच १२ ठिकाणी वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या दिवशी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ठाणे वाहतूक पोलिसांनी येथे मोठे वाहतूक बदल लागू केले आहेत. सशक्तीकरण अभियान कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ठाण्यातील अंतर्गत मेट्रो, नवीन महापालिका मुख्यालय, नैना पायाभुत सुविधा प्रकल्प यांचे भूमिपूजन केले जाणार आहे. येत्या काही दिवसांत विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात असतानाच, त्याआधी म्हणजेच ५ ऑक्टोंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ठाण्यातील घोडबंदर भागात मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कासारवडवली येथील बोरीवडे भागातील वालावलकर मैदानात हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाची ठाणे जिल्हा प्रशासन आणि महापालिकेमार्फत जय्यत तयारी सुरू आहे. याठिकाणी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पथकांना जबाबदारी नेमून देण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी नुकतीच एक बैठक घेऊन काही सूचना केल्या. त्यामध्ये हवामान खात्याने वर्तविलेली पावसाची शक्यता लक्षात घेवून मुख्य सभामंडप, वाहनतळ व्यवस्था, वीज पुरवठा, इंटरनेट सेवा, आरोग्य सेवा यांची पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार याठिकाणी ४० हजारांच्या आसपास नागरिक बसू शकतील, असा भव्य मंडप उभारण्यात आलेला आहे. याठिकाणी एकूण तीन मंडप उभारण्यात आले आहेत. दोन मंडपांच्या ठिकाणी एलईडी स्क्रीन बसविण्यात आलेल्या आहेत. या कार्यक्रमास सुमारे ४० हजार नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असून ठाणे तसेच ग्रामीण आणि महापालिकांमधून सुमारे १२०० बसगाड्यांची वाहतूक घोडबंदर भागात होणार असून एक किमीच्या परिघात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science | B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.M.S. | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. HISTORY | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY | M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

## मेरा युवा भारत अंतर्गत महात्मा गांधी जयंती निमित्त

# ‘स्वच्छता ही सेवा’ कार्यक्रमाचे आयोजन




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : नेहरू युवा केंद्र ठाणे द्वारे मेरा युवा भारत उपक्रम अंतर्गत महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता ही सेवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ३ महाविद्यालयांमधून एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला . हा उपक्रम एनएसएस युनिट - अचिव्हर्स कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट कल्याण, बी. के. बिर्ला नाईट कॉलेज आणि मोहींदर सिंग काबल सिंग डिग्री कॉलेज, सोलेस इंडिया आणि शिवरत्न फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित केला होता.

कल्याण पश्चिमेतील काळा तलाव आणि खडकपाडा परिसरात हि स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या प्रसंगी अचिव्हर्स कॉलेजचे संस्थापक प्राचार्य, सी.ए. डॉ. महेश भिवंडीकर, एनएसएस कार्यक्रम अधिकारी राजेश कुमार यादव, केडीएमसी ब्रँड अॅम्बेसेडर व माजी पोलीस उपायुक्त, पंजाब पोलीस, डॉ. रुपिंदर कौर मुरजानी, एनएसएस कार्यक्रम अधिकारी शशिकांत तिवारी (एमके कॉलेज), प्रणित कासरे (बिर्ला नाईट कॉलेज), स्वप्नील जाधव, निमित शाह, मयूर सुर्वे, यश पाटील, शिवरत्न फाऊंडेशनचे रत्नेश महाडिक उपस्थित होते.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना नेहरू युवा केंद्र कडून सहभगी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. स्वच्छता अभियाना द्वारे गांधीजींच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये स्वच्छते बाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी परिसरातील नागरिकांनीही या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे एकत्रितपणे स्वच्छ आणि सुंदर शहराची कल्पना पुढे नेण्यात आली.

# सुनील इंगळे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : श्री सुनील इंगळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जनमानसात आपला आगळावेगळा ठसा उमटवला आहे, विविध वृत्तपत्रांमधून जनसामान्यांच्या आवाजाला प्रतिनिधित्व देऊन त्यास वाचा फोडणे, त्यावर शासनाचे जनप्रतीनिधी यांचे लक्ष वेधून त्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देण्याचे कार्य ते गेली ३४-३५वर्षे निरंतर करीत आहेत. स्वतः पत्नीसह व इतर ६४ व्यक्तींना नेत्रदान नोंदणी संकल्प करण्यास प्रेरित केले आहे. स्वतः इंगळे यांनी गेल्या वर्षी देहदानाचा संकल्प केला आहे. काव्य कन्या बहिणाबाई चौधरींच्या काव्यातील समाजप्रबोधनाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी बहिणाई चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करून बहिणाबाईं राज्यस्तरीय गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात त्यांचा मोठा पुढाकार असतो. आजपर्यंत एकसष्ठ राज्यस्तरीय व दोन राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे कार्य पाहून, त्यांचे कार्य पाहून त्यांना आदर्श रायगड वृत्तपत्र वृत्तवाहिनीचा आदर्श रायगड राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात आले यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे,ह.भ. प. उमेश महाराज शेडगे, का.संपादक शैलेश सणस, उपसंपादक अविनाश म्हात्रे,मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, प्रेरणा फाउंडेशनचे अध्यक्षा सौ.प्रेरणा कुलकर्णी सहित सामाजिक- सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सुनील इंगळे यांना समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

या आगळयावेगळया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या गावकर यांनी केले व सरते शेवटी उपसंपादक अविनाश म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# २ री माळ : श्री ब्रह्मचारिणी



*नवरात्राची दुसरी माळ दुर्गा देवीचे द्वितीय स्वरुप ‘ब्रह्मचारिणी’ देवीला समर्पित आहे. येथे ’ब्रह्म’ या शब्दाचा अर्थ ‘तपस्या’ आहे. ब्रह्मचारिणी म्हणजे तपाचे आचरण करणारी. ऋवेदस्तत्वं तपो ब्रम्हज्ञ म्हणजे वेद, तत्व आणि ताप हे ब्रम्ह शब्दाचे अर्थ आहेत. नवरात्राच्या दुर्सया दिवशी या मातेची पूजा केली जाते. ब्रह्मचारिणी देवीच्या पूजनाने मनुष्याला भक्ती आणि सिद्धी दोन्हींची प्राप्ती होऊ शकते असं सांगितलं जातं. हजारो वर्ष अत्यंत कठोर तपाचरण केल्यामुळे दुर्गा देवीच्या या स्वरुपाला ब्रह्मचारिणी असं नाव पडले. देवीने कठोर तपाचरणाने महादेव शिवशंकराला प्रसन्न करून घेतले. ब्रह्मचारिणी देवीच्या शुभाशिर्वादामुळे तप, जप, ज्ञान, वैराग्य, त्याग, संयम आणि धैर्य प्राप्त होते असं म्हणतात. ब्रह्मचारिणी देवीचे स्वरूप पूर्ण ज्योतिर्मयी आणि अत्यंत भव्य असून, देवीच्या उजव्या हातात जपमाळ आणि हातामध्ये कमंडलू आहे. मुखमंडल तेजोमय असून, हस्तबंध आणि बाजुबंध कमळपुष्पांनी सुशोभित आहेत.*

## कल्याण पूर्वेतील सोसायटीतील राहिवाशांचे

# केडीएमसी मुख्यालयावर बेमुदत उपोषण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : कल्याण पूर्वेतील तिसगांव नाका येथील ’सहजीवन रेसिडेन्सी’ या सोसायटीमधील विकासक, महापालिका, पोलीस यांच्याकडील मागण्यांबाबत आणि स्थानिक दादागिरी-गुंडगिरीच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, येथील रहिवाशांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयावर धडक देत ’बेमुदत उपोषण’ सुरू केले आहे.



सहजीवन रेसिडेन्सीमध्ये २३० कुटुंबे असून सुमारे दिड हजारहून अधिक रहिवासी राहत आहेत. गेली अनेक वर्षे येथील रहिवासी कंपाऊंड वॉल आणि सोसायटी संबंधित अनेक प्रश्नासाठी, विकासक पप्पू बिल्डर्स आणि ग्रुप यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. महापालिका यंत्रणा आणि पोलिसांकडे दाद मागण्यासाठी अनेक तक्रारी, कायदेशीर आणि सनदशीर मार्गाने मांडल्या. मात्र विकासक, महापालिका, पोलीस यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी अजूनही रहिवाशांना न्याय देऊ शकले नाहीत.बिल्डरने अपूर्ण ठेवलेली, दक्षिण बाजूकडील अर्धवट अधिकृत वाडेभिंत, त्वरित बांधून बंदिस्त करणे. हद्दकायम करून देणे बाबतः या भूखंडास भूमी अभिलेख मोजणी नकाशानुसार, महापालिकेने परवानगी दिली आहे. परंतु ’सहजीवन फेडरेशनए, बी, सी, विंग रहिवाशांना प्रकल्पाच्या हद्दीबाबत साशंकता असल्याने, नकाशानुसार त्वरित मोजणी करून, हद्दकायम करून देण्यात यावी. यांसह इतर मागण्यांसाठी क्षेत्रीय स्तरावर वारंवार पाठपुरावा करूनही न्याय्य आणि हक्काच्या मागण्याबाबत रहिवासी अजूनही वंचित असून अखेर आज या रहिवाशांनी आपल्या विविध मागण्यांसाठी केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढत बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

# पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात स्वच्छता मोहीम






**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

पेण ; पेण येथील भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे महात्मा गांधी व मा.पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी कॉलेजच्या एन एस एस युनिट व डी. एल. एल. ई.युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती.

याप्रसंगी मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोंना पुष्पहार घालून उपस्थित मुलांनी फुले वाहून अभिवादन केले. यानंतर डी. एल. एल.ई. युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ.देवीदास क बामणे’ आणि एन एस एस चे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे यांनी उपस्थितांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले व राष्ट्राच्या प्रगतीसाठी स्वच्छता किती महत्त्वाची आहे याचा संदेश उपस्थितांना दिला.

यानंतर ’स्वच्छता प्रतिज्ञा’ घेऊन उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली.

याप्रसंगीडी.एल.एल.ई. युनिट चे डॉ. देवीदास बामणे एन एस एस युनिटचे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे प्रा. सौ सायली पितळे प्रा. सौ. वैदेही जोशी प्रा. सौ सोनल पाटील इत्यादी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या परिसर व वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व या मोहिमेत सहभागी होऊन आपले घर आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेऊन या कार्याला हातभार लावला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

## कमलादेवी पब्लिक स्कूल मध्ये

# आंतरशालेय ‘क्षितिज’ सोहळा



कल्याण : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विठ्ठल वाडी येथील सुप्रसिद्ध कमलादेवी पब्लिक स्कूल मध्ये शालेय क्रिडा पट्टुंचा विविध खेळांच्या प्राविण्यतेचा क्षितीज सोहळ रंगला. ज्या मध्ये कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील शाळांमधिल विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने या सोहळ्याचं आयोजन करण्यात आले होते. कल्याण डोंबिवली आणि आसपासच्या उपनगरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी झटणाऱ्या विठ्ठल वाडी येथील कमलादेवी शिक्षण संस्था द्वारा संचालित कमलादेवी पब्लिक स्कूल मध्ये आंतरशालेय विविध खेळांच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यात बुध्दीबळ , कैरम , पॉवर पॉइंट प्रेजेंटेशन आणि पोस्टर मेकिंग ई. स्पर्धाचा यात समावेश करण्यात आला होता. ज्यात एकंदरीत जिसमें १३४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

याप्रसंगी, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शिक्षा विभागाचे चंदन माने उपस्थित होते. त्याप्रमाणे, कमलादेवी शिक्षण संस्थेच्या श्वेता पांडे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि बौद्धिक स्वास्थ्या करिता व्यायाम आणि खेळांचे महत्त्व या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांना पटवून देण्यात आले. त्याचप्रमाणे येणाऱ्या आधुनिक युगामध्ये बौद्धिक सक्षमतेचे महत्त्व पावरपाईंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून चर्चा करण्यात आली.

# जिल्ह्यात सण,उत्सव कालावधीकरिता मनाई आदेश जारी

पेण : रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रामध्ये खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगांव, महाड, नागोठणे, अलिबाग या ठिकाणी मोठया प्रमाणावर औद्योगिक कारखाने असून औद्योगिक कंपन्यांमध्ये कामगार संघटनांकडून आपल्या विविध मागण्यांसाठी अचानक संप व आंदोलन पुकारण्यात येत असतात त्यामुळे अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो. रायगड जिल्ह्यामध्ये बहुतांशी गांवामध्ये हिंदु-मुस्लिम बौध्द तसेच इतर धर्मीयांची मिश्रवस्ती असल्याने अधुन मधुन वैयक्तिक कारणांमुळे पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये हिंदू-मुस्लिम हा माहीती कार्यालय युक्तीमध्ये जातीय तणावाच्या घडना घडून दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे घडण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे देखील हिंदू-मुस्लिम जातीय तणावाची परिस्थिती निर्माण होत आहे. दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना यांच्यावतीने श्रीमती रूपाली नाकाडे, अध्यक्ष अमेदा या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देवून सर्व कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणे ही मागणी पूर्ण न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन करण्यात येणार आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी श्री. प्रसाद जयराम तिखंडे हे कर्जत तालुक्यातील नागरीकांची रखडलेली शासकीय कामे, मागण्या, अडचणी व होणाऱ्या अन्यायाबाबत न्याय मिळावा तसेच कर्जत तालुक्यातील सर्व सामान्य लोक प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करत असतात तरीही न्याय मिळत नाही, शासकीय कामे पार पाडण्यास दिरंगाई होते कर्जत तालुक्याचा प्रशासकीय कारभार कायदेशीर व नियमानुसार न चालता हुकूमशाहीने व मनमानी पध्दतीने चालतो त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी मागणी करीता प्रांत कर्जत यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसलेले असून सदरचे उपोषण सुरूआहे. दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी अखिल भारतीय विकास परिषदेच्या वतीने श्री.लकी जाधव यानी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला

राज्य सरकारने आंदोलन करणार आहेत बळी पडू नये यासाठी रास्ता रोको आंदोलन करणार आहेत. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी श्रीमती अंजली अरूण मुदस यांची २०१५ पासून बिल्डर लॉबी गजानन अंकुश दळवी व इतरांनी जमीनीच्या संदर्भात आर्थिक व मानसिक खच्चीकरण केलेले आहे याबाबत चौकशी करून तात्काळ दोषीविरुध्द कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवालाची प्रत न मिळाल्यास अंगावर पेट्रोल ओतून जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथे आत्मदहन करणार आहेत. महाड पोलीस ठाणे हद्दीत दि.०२ ऑक्टोबर २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय महाड येथे प्रा.डॉ. सुभाष रामराव कदम हे त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राचे हद्दीत दि.०३ ऑक्टोबर २०२४ ते दि.१२ ऑक्टोबर २०२४ रोजी दरम्यान हिंदु बाधवाचा नवरात्रौत्सव हा सण साजरा होणार आहे. रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राचे हद्दीत दि.१२ ऑक्टोबर २०२४ रोजी बौध्द बांधवांचा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात येणार आहे. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दि.०७ ऑक्टोबर २०२४ रोजी मौजे तोनविरा थांब्यावर जेष्ठ नागरीक संस्था कामाले विभाग यांच्यावतीने श्री.बळवंत वालेकर हे अलिबाग व मुरूडकडे येणाऱ्या सर्व जलद गाड्या थांब्याव्यात या मागणीसाठी रास्ता रोको करणार आहेत.वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता, नमूद औद्योगिक क्षेत्रात शांतता प्रस्थापित राहावी. तसेच सण उत्सव व राजकीय परिस्थिती आंदोलन/उपोषण व आत्मदहनाच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीकोनातून रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी ००.०१ वा. ते दि. १२ ऑक्टोंबर २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) मधील (अ), (ब), (क), (ड), (ई) व (फ) प्रमाणे खालील कृत्ये करण्यास या अधिसूचनेद्वारे प्रतिबंध करण्यात आली आहेत. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, वंदूका, सुरे काठया किंवा लाठया अगर शारिरीक दुखापत करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही तत्सम वस्तू बाळगणे. अंग भाजून टाकणारा पदार्थ किंवा कोणताही स्फोटक पदार्थ घेऊन फिरणे. दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे. व्यक्ती, प्रेत, आकृत्या यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन करणे. सार्वजनिक रितीने आक्षेपार्ह घोषणा देणे किंवा गाणे म्हणणे किंवा वाजविणे. सभ्यता अगर निती याविरुध्द असतील अशी जिल्हयाची शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथून पाडण्याचा संभव आहे अशी आवेशपूर्ण भाषणे किंवा हावभाव करणे किंवा सॉग करणे, चित्र, चिन्हे अगर कोणतीही तत्सम वस्तु, जिन्नस तयार करणे किंवा लोकांत प्रसार करणे. रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत पूर्व परवानगीशिवाय पाच अगर पाचाहून अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास किंवा मिरवणूकोस मनाई राहील.तसेच सदर अधिसूचना वरिष्ठांच्या आदेशानुसार किंवा कर्तव्यपूर्तीसाठी हत्यारे बाळगणे आवश्यक आहे. अशा शासकीय अधिकाऱ्यांना अशी हत्यारे योग्य रितीने बाळगण्यासाठी अगर ठेवून घेण्यासाठी लागू नाही.

ही अधिसूचना ही खऱ्या प्रेत यात्रेसाठी, अंत्यविधीच्या जमावास अगर शासकीय समारंभासाठी लागू नाही. तथापि, सदर कालावधीत होणारे उत्सव, सभा, मिरवणूका इत्यादी कार्यक्रमास परवानगी देण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना देण्यात येत आहेत. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन शांतता धोक्यात येणार नाही याची जबाबदारी आयोजकांवर राहील, या अटीवर परवानगी द्यावी.







०४ ऑक्टोबर २०२४ शुक्रवार

**मेष**
तुमच्या स्वतःच्या विचारांसोबतच तुम्हाला इतर लोकांच्या विचारांकडेही लक्ष देण्याची गरज आहे. उत्पन्नाचे स्रोत वाढल्याने खर्चही जास्त राहील.

**वृषभ**
तुमचे काम अधिक सोपे होईल. जवळच्या लोकांच्या भेटीमुळे फायदा होईल.तुमच्या जोडीदाराच्या पाठिंब्याने तुम्हाला काही मोठ्या कामात यश मिळेल.

**मिथुन**
जे तुम्ही संयमाने सोडवाल.तुम्हाला समस्येचे निराकरण देखील मिळेल. आज तुम्हाला तुमच्या पालकांकडून स्नेह मिळेल.वेळ कामात जाईल.

**कर्क**
आज तुम्ही तुमचा जोडीदार आणि कुटुंबासोबत मनोरंजनात आणि कुटुंबातील सदस्यांसोबत थोडा वेळ घालवाल. यामुळे मन प्रसन्न राहील.

**सिंह**
तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा चांगली असेल.आज तुमचे आरोग्य चांगले राहील.तुमच्यासाठी चांगल्या ठरू शकतात.आत्मविश्वास जाणवेल.

**कन्या**
करिअरमध्ये नवीन सुरुवात करण्याचा विचार करतात. त्यांच्यासाठी आजचा दिवस शुभ आहे.काही महत्त्वाच्या कामासाठी परदेश प्रवास करू शकतात.

**तूळ**
तुम्ही ज्यांच्या संपर्कात याल त्यांच्याशी प्रेमाने वागाल. तुमच्या विचारांमध्ये स्थिरता आणि दृढनिश्चय आल्याने तुम्ही तुमचे काम चांगल्या प्रकारे करू शकाल.

**वृश्चिक**
आजचा दिवस चांगला आहे.तुम्हाला अशी एखादी व्यक्ती भेटू शकते जी तुम्हाला भविष्यात नक्कीच लाभदायक ठरेल. कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घ्या.

**धनु**
प्रवास लाभदायक होईल. व्यवसायाच्या बाबतीत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. सध्या कामाचा वेग मध्यम राहील. कठीण काळ संयमाने निघून जाईल.

**मकर**
हितचिंतकांकडूनही तुम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल.नवीन अभ्यास क्रमात सहभागी होण्यासाठी आजचा दिवस शुभ आहे. संयमाने कामे पूर्ण करा.

**कुंभ**
तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत घरातील महत्त्वाच्या कामात मदत करू शकता. तुम्हाला कोणतेही काम करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागेल.

**मीन**
समाजाशी संबंधित कामांमध्ये तुमच्या कल्पनांना विशेष प्राधान्य मिळेल. तरुणांना त्यांच्या इच्छेनुसार काही काम करून दिलासा मिळेल.

# पाऊले चालती दुर्गाडीची वाट



नवरात्र उत्सव आला की भक्तांचे डोळे दुर्गाडी किल्ल्याकडे लागलेले असतात कारण दुर्गाडी किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व तर आहेच परंतु दुर्गादेवीची ह्याच किल्ल्यावर स्थापनाही झालेली आहे त्यामुळे भक्तांचा ओढ देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात दिसून येतो दुर्गाडी किल्ल्यावर हा उत्सव साजरा करण्यासाठी स्थापलेल्या समितीच्या प्रमुख पदी शिंदे शिवसेना गटाचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील व आमदार विश्वनाथ भोईर यांचे सह शेकडो सदस्यांची समिती आहे. तसा हा उत्सव साजरा करण्याचे सर्व नियोजन ह्या दोन प्रमुख मार्गदर्शकाच्या हाती आहे. उत्सव साजरा होण्यापूर्वी काही महिन्या आधीच बुरुजाचा काही भाग व किल्ल्याची पडझड दुसऱ्यांदा झाली होती. तोही दर्शनी भागाच्या लगतचा. तो त्यामुळे रवी पाटील व आमदार भोईर यांनी यासाठीच्या दुरुस्तीचे व दुर्गादेवीच्या सुशोभीकरणासाठी मुख्यमंत्र्यांशी भेट घेतली व वस्तुस्थितीची जान त्यांना करून दिली.नवरात्र उत्सव जवळ आल्याने व किल्ल्याची पडझड झाल्याने तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे व दुर्गादेवीच्या सुशोभीकरणाचेही काम घेणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांना सांगताच मुख्यमंत्र्यांनी त्यासाठी खास विशेष निधी १२:३० कोटींचा उपलब्ध करून दिला. तातडीने ह्या कामालाही सुरुवात झाली हो होत असणारे कामावरती पाटील व भोईर यांचे बारीक लक्ष ठेवण्यात येत होते. भाविकांना दर्शनासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात येत होती. उत्सव असल्याने रात्रंदिवस या किल्ल्याची दुरुस्तीची कामे सुरूच ठेवण्यात आली होती मंदिरासह संपूर्ण दुर्गाडी किल्ल्या ला आकर्षक रोषणाईने उजळण्यात आले.

मंदिराच्या सभोवती भव्य मंडपही उभारला गेला. चोख व्यवस्थेची जाण यातून दिसून येत होती. दरवर्षी लाखो पाऊले चालती दुर्गाडीची वाट कल्याण नवरात्र उत्सव आला की भक्तांचे डोळे दुर्गाडी किल्ल्याकडे लागलेले असतात कारण दुर्गाडी किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व तर आहेच परंतु दुर्गादेवीची ह्याच किल्ल्यावर स्थापनाही झालेली आहे त्यामुळे भक्तांचा ओढ देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात दिसून येतो दुर्गाडी किल्ल्यावर हा उत्सव साजरा करण्यासाठी स्थापलेल्या समितीच्या प्रमुख पदी शिंदे शिवसेना गटाचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील व आमदार विश्वनाथ भोईर यांचे सह शेकडो सदस्यांची समिती आहे. तसा हा उत्सव साजरा करण्याचे सर्व नियोजन ह्या दोन प्रमुख मार्गदर्शकाच्या हाती आहे. उत्सव साजरा होण्यापूर्वी काही महिन्या आधीच बुरुजाचा काही भाग व किल्ल्याची पडझड दुसऱ्यांदा झाली होती. तोही दर्शनी भागाच्या लगतचा. तो त्यामुळे रवी पाटील व आमदार भोईर यांनी यासाठीच्या दुरुस्तीचे व दुर्गादेवीच्या सुशोभीकरणासाठी मुख्यमंत्र्यांशी भेट घेतली व वस्तुस्थितीची जान त्यांना करून दिली. नवरात्र उत्सव जवळ आल्याने व किल्ल्याची पडझड झाल्याने तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे व दुर्गादेवीच्या सुशोभीकरणाचेही काम घेणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांना सांगताच मुख्यमंत्र्यांनी त्यासाठी खास विशेष निधी १२:३० कोटींचा उपलब्ध करून दिला. तातडीने ह्या कामालाही सुरुवात झाली हो होत असणारे कामावरती पाटील व भोईर यांचे बारीक लक्ष ठेवण्यात येत होते. भाविकांना दर्शनासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात येत होती. उत्सव असल्याने रात्रंदिवस या किल्ल्याची दुरुस्तीची कामे सुरूच ठेवण्यात आली होती मंदिरासह संपूर्ण दुर्गाडी किल्ल्याला आकर्षक रोषणाईने उजळण्यात आले. मंदिराच्या सभोवती भव्य मंडपही उभारला गेला. चोख व्यवस्थेची जाण यातून दिसून येत होती. दरवर्षी लाखो भक्तगणांकडून दर्शनासाठी येणे येत होतं त्यात अति महत्त्वाच्या व्यक्तींचाही समावेश होता. ह्या उत्सवाला एक प्रकारे जनतेचे स्वरूप असते. दुर्गाडी किल्ल्यासमोर यावेळी व्यापाऱ्यांसाठी जागा दिल्याने व व्यापाऱ्यांकडील सर्व प्रकारचे सामान घेण्यासाठी धावपळ होण्याची शक्यता असल्याने थोडं लांब अंतरावर ही व्यवस्था करण्यात आली गतक काही वर्षाचा अनुभव पाहता या नवरात्र उत्सवाच्या दरम्यान करोडो रुपयांची उलाढाल होऊ लागली. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून जागेसाठी मागण्याही वाढू लागल्या. परंतु जागा उपलब्ध असल्याच्या मर्यादेपर्यंतच याबाबतचा निर्णय घेण्यात आला. नव्याने होऊ घातलेल्या रिंग रोडवर व्यापाऱ्यांना जागा मिळाल्याने मनोरंजनाची तसेच प्रसाद खाऊ व विविध खेळ खडून नारायणाच्या प्रमाणे पूजा साहित्याचे सामान विकणारे व्यापारी तेथे दिसून येत आहेत. मंगळवारी या उत्सवाच्या पूर्वतयारीची चाचणी घेण्यात आली. बुधवारी आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते सकाळी सहा वाजता घटस्थापनेचा कार्यक्रम होणार असून भजन कीर्तन प्रवचनाच्या फेरी झडणार आहेत. भक्तांची गोष्ट होणार नाही याची सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली असून पिण्याचे पाणी भक्तांना प्रसाद दर्शन रांग या नियोजनामुळे व या परिसराला नवीन झळाळी आल्याने भक्तांचा ओढा वाढणार आहे विशेष म्हणजे सेवेकरी महिला भगिनींचा ह्या व्यवस्थेमध्ये फार मोठा सहभाग आहे.

किल्ले दुर्गाडी देवस्थानातर्फे अग्निहोमाची तेजस्विता वेदमंत्रांची पवित्रता व मंगल वाद्यांचा ध्वनी या सुशोभितेतेमुळे भक्तांचा ओढा दरवर्षी वाढतच आहे. महिला भजनी मंडळाची भजने कोळी आगरी समाजाची पारंपारिक पूजा सप्तशती पाठ शेती समाजपरंपारिक पूजा काकड आरती गजानन प्रासादिक भजनी मंडळाचे भजन कोळी देशमुख मराठा समाज महिला पारंपारिक पूजा अशा अनेक भरगच्च कार्यक्रमाने हा उत्सव आनंदाने साजरा होणार आहे अशी माहिती अध्यक्ष रवी पाटील यांनी आमच्या प्रतिनिधींना दिली.

### कचरामुक्त तारांकित सोसायटी स्पर्धेत

## रोझाली एल एक्स सोसायटीचा प्रथम क्रमांक



कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे सन २०२४ कचरामुक्त तारांकित सोसायटी स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये कल्याण डोंबिवली महानगर महानगरपालिकेतील ३५० सोसायटी सहभागी झाल्या होत्या. त्याचा पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी आचार्य अत्रे रंगमंदिर नाट्यगृह येथे केडीएमसी आयुक्त, घनकचरा उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त, सचिव व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.या वितरण सोहळ्यामध्ये ७ ते १७ माळ्याच्या सोसायटी या कॅटेगरी मध्ये रोझाली एल एक्स कॉ. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., गोदरेज हिल, खडकपाडा बारावे यांना प्रथम पारितोषिक म्हणून रू. १५ हजारांचा चेक, प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सोसायटीचे चेअरमन राकेश पुरस्वानी, सचिव सुनील घेगडे, खजिनदार अरुण नायर, सदस्य सुरेश ठाकूर, गोवर्धन भट्ट हे उपस्थित होते.

### जीवन सुंदर आहे..

## या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे



ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या या ओळी माणसाला जगण्याचा अर्थ उलगडून सांगतात. प्रत्येकाला जन्म हा एकदाच मिळतो. तो जगताना जन्मावर जीवापाड प्रेम करावे लागते असे यातून स्पष्ट होते. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आयुष्याच्या प्रवासात प्रत्येक गोष्टीचा आनंद घेत जीवन जगता आले तरच जीवन सुंदर होते. जीवन मुळातच सुंदर आहे फक्त त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक असला की, प्रवास सुखकर व आनंददायी होतो. आयुष्याच्या प्रवासात कितीतरी माणसे भेटतात. त्यातील काही आपल्या ला अर्ध्या वाटेवर सोडून जातात तर काही आपली नसूनही रक्तापल्याड नात्याने ती कायमची जोडली जातात.

प्रत्येक नात्याला प्रेमाने जिंकून रेशमी धाग्याने घट्ट बांधता आले तर आयुष्य अधिकच सुंदर होते. सुख दुःख तर प्रत्येकाच्या वाट्याला आलेले असतातच, परंतु दुःखात खचून न जाता त्याला धैर्याने सामोरे जातो तोच यशस्वी होतो. दुःख झाकून ठेऊन दुसऱ्यासाठी जो जगतो तोच आयुष्यात आनंदी राहतो. दुसऱ्याच्या अश्रूंचे मोल जाणून त्यांच्या हृदयात घर करतो तोच आपल्याही अश्रूंची फुले करण्यास यशस्वी होतो. झाडाची पाने गळून पडली तरी त्या जागी नवीन पालवी फुटते. पण माणसाचे तसे नाही. एकदा प्राण निघून गेला की, आयुष्याचा शेवट होतोच हा निसर्गाचा नियमच आहे. म्हणून आयुष्य आनंदाने जगताना इतरांनाही आनंदाने जगण्यास हातभार लावला पाहिजे ही मनाची तयारी प्रत्येकाने केली तरच आयुष्य सुंदर होईल. आपल्यापेक्षा किती तरी माणसे दुःखात चाचपडत असतात याचा आपण कधी विचारच करत नाही. आपलेच दुःख मोठे असे समजून आपण मनात कुढत, रडत राहतो. त्यातच आपले आयुष्य कधी निघून जाते हे आपल्याला कळत देखील नाही. दुःखातही मी खूप सुखी, समाधानी आहे अशी मनाची धारणा केली तरच जगण्याचा अर्थ कळेल. स्वतःतला अहंकार, मीपणा सोडून जो दुरितांची सेवा करतो. सेवेतून इतरांना आनंद देतो. त्याचे जीवन फुलाप्रमाणे सुगंधित होते. जो दुस-याचे आयुष्य कोणतीही अपेक्षा न ठेवता सुगंधित करतो त्याच्या आयुष्यात फुलांचा वर्षाव होत असतो.

आयुष्यात अनेक चढ उतार येतात. वादळ वा-यांना समर्थपणे सामोरे जाण्याची हिंमत माणसाने ठेवली पाहिजे. एका फळात किती बिया आहेत हे आपण मोजू शकतो, परंतु एका बीमध्ये किती फळे आहेत हे मात्र जाणू शकत नाही. याचाच अर्थ जे बीज आपण पेरतो, त्यातून जी फळे मिळतील ती कित्येक पटीने वाढून मिळतील. कारण निसर्गनियम सांगतो, प्रत्येक बीजापासून असंख्य फळे मिळतात. मग ते बीज चांगुलपणाचे असो वा वाईटपणाचे... अंतःकरणातील विचारांना योग्य दिशा देवून बीजाप्रमाणे त्यांची पेरणी केली की, हेच विचार कित्येक पटीने वाढून जीवनात आनंदाची हिरवळ निर्माण करता येते.. अशा हिरवळीवरुन चालताना कधी, कुठे आणि कोणाबरोबर आपले ऋणानुबंध जुळून येतील हे सांगता येत नाही. ऋणानुबंध हा हृदयाचा असा दरवाजा आहे, तो कोणालाही सहजासहजी उघडता येत नाही. आणि त्या दरवाजाने प्रवेश केलेली माणसं सहजासहजी बाहेरही जाऊ शकत नाहीत. ऋणानुबंधाची नाती ही फूल आणि सुगंधासारखी असतात.. जी परस्परांपासून कधीच दूर होऊ शकत नाहीत. अशा नात्यातली माणसं लवकर भेटली नाहीत तर, भेटीची आतुरता वाढते.. त्यांच्या वाटेकडे डोळे लागून राहतात.. जीव कासावीस होतो.. प्रत्येक मानवी जीवाच्या दोन इच्छा असतात. एक मला सार्वभौमपद मिळावे. म्हणजे राजा होण्याची इच्छा असते. दुसरे मृत्यू.हे सत्य असून मानवी देह तो स्वीकारायला तयार नसतो. त्याला मरण नकोसे वाटते. हे कटूसत्य असून ते न स्वीकारल्यामुळे मानवी जीवनात वाट्याला दुःख येते...

इथे मानवी जीवनाचा अर्थ समजून घ्यावा लागतो. प्राजक्ताच्या झाडावर सायंकाळी कळ्या जन्म घेतात.. पहाटे उमलतात.. सूर्योदयापूर्वी मातीवर गळून पडतात.. गळून पडलेल्या त्या फुलांना मातीचा स्पर्श झाला की, त्यांना अधिक सुगंध येतो.. तो आसमंत भरुन उरतो.. आयुष्य थोडे असूनही कृतार्थतेची कोमल भावना सोबत घेवून दुसऱ्यांना आनंद देण्याची वृत्ती प्राजक्ताजवळ आहे. माणसाचे जीवन याहून वेगळे नाही.. बालपण, तरुणपण आणि वार्धक्य या तीन अवस्थांमधून जाताना माणसाला त्या त्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते. तिन्हीपैकी कोणतीच अवस्था चिरकाल टिकणारी नाही. फुलाप्रमाणे एक दिवस माणसालाही असेच गळून पडावे लागते.. गळून पडणाऱ्या फुलांचे जसे गाणे होते, तसे माणसाच्याही गळून पडण्याचे गाणे व्हावे अशी एक अतिव भावना माणसाच्या हृदयात निर्माण व्हावयास हवी.. इतरांविषयी आपल्यात आणि आपल्याविषयी इतरांत चांगुलपणा निर्माण करता आला पाहिजे. चांगुलपणा, माणुसकी, आपुलकी, स्नेह, प्रेम, कृतज्ञता, कृतार्थता या गोष्टी विकत घ्याव्या लागत नाहीत. सागराच्या तळाशी असलेल्या शिंपल्यातील मोत्याप्रमाणे त्या आपल्या हृदयाच्या तळाशी असतातच. त्यांचा शोध घ्यावा लागतो. त्यासाठी तळाशी खोलवर जाण्याची तयारी असावी लागते. धैर्य असले की, शोध लागतो. शोध लागला की, ध्येयाची फल श्रुती हाती येते. हे जगण्याचे सूत्र माणसाला शोधता आले पाहिजे.आपले शरीर नश्वर आहे त्यामुळे सौंदर्याचा कधीही अहंकार न करता आहे त्या रंग, रूपावर प्रेम करायला शिकले पाहिजे. माझे मीपण गळून गेले तरच जगणे सुंदर होईल. जीवन क्षणभंगुर आहे. त्यामुळे आनंदी रहा. आणि प्रत्येकाला आपले समजा. प्राणिमात्रांवर प्रेम करा. जीवनाचे वेगवेगळे पदर उलगडताना आई - वडील, बहीण भाऊ, पती- पत्नी, मुले,नातेवाईक, मित्र-मैत्रिणी तसेच रक्तापल्याड जपलेल्या नात्यांना वेळ द्या.. यातूनच आपले जीवन सुंदर होईल...



सौ. दीप्ती दिलीप यादव
पदवीधर शिक्षिका
जि. प. शाळा माणी नं. १
ता. खेड, जि. रत्नागिरी
मो.नं.७४९९६३६५३१

## अर्बन अल्ट्रा रनचे रविवारी उद्घाटन

### 'एक दौड वीर जवानों के लिए'चे ५ वे वर्ष

कल्याण : धावपटूंच्या क्षेत्रातील एक आगळीवेगळी धाव 'एक दौड वीर जवानों के लिए' ६५ किलोमीटर अर्बन अल्ट्रा रन (पर्व ५ वे) ही धाव गेटवे ऑफ इंडिया ते डोंबिवली दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी रनर्स क्लन फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत आयोजित केली आहे. या सामाजिक उपक्रमाचा उद्घाटन सोहळा रविवारी ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता सावळाराम क्रीडा संकुल, डोंबिवली येथे होणार आहे.

या आगळयावेगळया रन मध्ये महाराष्ट्रातून तसेच देशभरातून ५०० ते ६०० धावपटू धावणार आहेत. हि धाव प्रामुख्याने तीन प्रकारची असेल त्यामध्ये ६५ कि.मी. ३५ की.मी. आणि १५ की. मी. पूर्ण करण्याची आहे. या तीनही प्रकाराचा शेवट डोंबिवली येथे होणार असून या धावेत क्रांती साळवी या रनच्या ब्रँड अँबेसिडर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मॅरेथॉन आहेत. त्यांनी यापूर्वी अनेक मॅरेथॉन साडी परिधान करून पूर्ण केले आहेत त्याचप्रमाणे त्या ६५ किलोमीटर मॅरेथॉन देखील साडी परिधान करून पूर्ण करणार आहेत.

हा उद्घाटन सोहळा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, क्रांती साळवी, बिजय नायर निवृत्त लेफ्टनंट कमांडर भारतीय नौ सेना, के. हरिदासन कोच रणटॅस्टिक दिलसे, माधव सिंग ग्लोब बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, रूप बेताला इंटरनॅशनल मॅरेथॉनर, निखिल दुधे, पॅसिफिक बिल्डर ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या उपक्रमाचे आयोजक रनर्स क्लेन फाउंडेशन आणि सभासद आहेत.

## एसएसटी महाविद्यालयाला 'स्वच्छ महाविद्यालय'चा किताब



कल्याण : केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२४ अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत एस. एस.टी. महाविद्यालयाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्याल यांमध्ये 'स्वच्छ महाविद्यालय'चा प्रथम क्रमांक पटकावला.

गांधी जयंती निमित्त सिंधू भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळयात आमदार कुमार आयलानी आणि आयुक्त विकास ढाकणे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना सन्मानित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संतोष करमानी आणि डॉ. दीपक गवादे यांच्यासह प्रा.देविदास जळकोटे, DLLE जिल्हा समन्वयक प्रा. दिलीप आहुजा आणि स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या वतीने हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांनी महाविद्यालयाच्या या मोठ्या यशाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षकांच्या स्वच्छता मोहिमेतील योगदानाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, महाविद्यालयाने आपले वर्ग,परिसर आणि मैदानाच्या नियमित स्वच्छते सोबतच पथनाट्य आणि फ्लॅश मॉबद्वारे समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती केली असून यापुढेही स्वच्छतेसाठी महाविद्यालय कटिबद्ध राहणार आहे.

## आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालयात कथाकथन स्पर्धेचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

ठाणे : आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालय आणि घोडके चिटणीस कला सांस्कृतिक प्रतिष्ठान ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धेचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालय, रघुनाथ नगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये अनेक विद्यालयांनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयीन गट व आंतर शालेय गट दोन विभागात स्पर्धा घेण्यात आली.



आंतरशालेय गटात प्रथम आलेली एस.व्ही .पी .टी सरस्वती विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी समृद्धी सीमा सूर्यकांत पाटील व महाविद्यालयीन गटात प्रथम आलेली मातोश्री प्रबोधिनी कॉलेजची विद्यार्थिनी कुमारी यशस्वी दाभोलकर यांना रोख रक्कम रुपये दोन हजार सन्मानचिन्हे प्रशस्तीपत्रक तसेच त्यांच्या विद्यालयाला स्मृतिचिन्हे देऊन गौरवण्यात आले. तसेच द्वितीय शालेय गटात अंबर इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी मुक्ता मापगावकर, महाविद्यालयीन गटात केजी जोशी आर्ट्स कॉलेजची विद्यार्थिनी कुमारी काजल घाटोळे यांना रोख रक्कम रुपये दीड हजार सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच तृतीय शालेय गटात सरस्वती सेकंडरी स्कूलचा विद्यार्थी गोपाळ पणशीकर व महाविद्यालयीन गटात वर्तक नगर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स सायन्स विद्यार्थ्यांनी कुमारी काजल मौर्या यांना रोख रक्कम रुपये एक हजार, सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच महाविद्यालयीन गटात आनंद विश्व ज्येष्ठ रात्र महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी सायली हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. सर्व विजेत्यांना प्रमुख पाहुणे ठाण्यातील नामवंत साहित्यिक लेखक विद्याधर ठाणेकर, तन्वी हर्बल्सच्या संचालिका डॉ. मेधा मेहेंदळे, शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ.प्रदीप ढवळ,उमेश घोडके, अशोक चिटणीस, शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठुसे यांचे हस्ते रोख रक्कम,सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कथाकथन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शालेय गटासाठी मंजुषा बल्लाळ व रामदास खरे तर महाविद्यालयीन विभागासाठी भारती मेहता व मकरंद जोशी यांनी परीक्षण केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ज्येष्ठ रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.हर्षला लिखिते यांनी करून दिला. माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सीमा हर्डीकर मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या कथाकथन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी अनेक नामवंत लोक, शारदा एज्युकेशन सोसायटीच्या सर्व विभागातील सर्व प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक ,विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री योगेश पंडित यांनी केले.

## विद्यार्थ्यांनी साजरा केला भारतीय वन्यजीव सप्ताह

### 'पर्यावरण दक्षता मंडळाचा २५ वा निसर्गमेळा २०२४ – कारवी महोत्सव'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

कल्याण : भारत देश जैवविविधतेने नटलेला आहे. या जैवविविधतेत विविध वन्यजीव अविभाज्य घटक आहेत. या वन्यजीवांच्या परस्परसंबंधाविषयी माहिती व्हावी आणि त्याच्या विषयी जनजागृती व्हावी यासाठी १९५४ सालापासून २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर हा आठवडा भारतीय वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. या सप्ताहाचे औचित्य साधून पर्यावरण दक्षता मंडळ विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दल प्रबोधन निर्माण व्हावे म्हणून दरवर्षी निसर्गमेळा आयोजित करते. हा निसर्गमेळा दरवर्षी एक विशिष्ट संकल्पसूत्रासह साजरा केला जातो. यावर्षीचा निसर्गमेळा कारवी महोत्सव म्हणून श्रीरंग शाळा येथे साजरा करण्यात आला.

पर्यावरण दक्षता मंडळ, श्रीरंग एज्युकेशन सोसायटी, एन्विरो व्हिजिल आणि रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी इस्टेट याच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी चित्रकला स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ, इंधनाशिवाय



पाककृती स्पर्धा, एक मिनिट स्पर्धा, पथनाट्य, पर्यावरण गीत, बायोरांगोळी, सादरीकरण स्पर्धा घेण्यात आल्या. या निसर्गमेळ्यातील इंधन न वापरता पाककला बनविणे या स्पर्धेचे विशेष म्हणजेच फळभाज्या, काही पालेभाज्या, काही कडधान्य यांचा वापर करून एखादी पाक कला इंधनाशिवाय बनवू शकतो हे या स्पर्धेच्या माध्यमातून अनुभवाय ला मिळालं. त्याचप्रमाणे चित्रकला स्पर्धेचा विषय पाणथळभूमी हा होता. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध रंगाचा वापर करून दिलेल्या विषयावर अप्रतिम चित्र काढली. पर्यावरण वाचविण्यासाठी पर्यावरण गीत हे जनजागृतीचे परिणामकारक माध्यम आहे. विविध पर्यावरण गीते या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केली.

या निसर्गमेळ्याचे विशेष म्हणजे सर्व स्पर्धांच्या ठिकाणी स्पर्धकांना कारवीची प्राथमिक माहिती परीक्षकांनी दिली.निसर्गमेळा - कारवी महोत्सवाच्या निमित्ताने कारवी वनस्पतीचा फुले ओरिगामी पद्धतीने दाखवली गेली. तसेच विद्यार्थ्यांकडून ओरिगामी पद्धतीने पक्षी बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविल व सर्व विद्यार्थ्यांनीही त्यांच्यासोबत बनवले. त्यानंतर कारवी वनस्पतीची माहिती पौर्णिमा शिरगावकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मानपाडा येथे यावर्षी कारवी फुलली आहे. कारवीचा बहर बघण्यास राष्ट्रीय उद्याना ला जरूर भेट द्या असं पौर्णिमा यांनी सांगितले.

## ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका उपलब्ध

मुंबई : ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका २८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मागविण्यात येत असून निर्मात्यांनी १ जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका दिलेल्या विहित मुदतीत सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी केले आहे. मराठी चित्रपटसृष्टीत राज्य मराठी चित्रपट पुरस्कार हा मानाचा पुरस्कार आहे. राज्य शासनाच्या वतीने या पुरस्कारासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५ येथील जनसंपर्क विभागात कार्यालयीन वेळेत प्रवेशिका उपलब्ध आहेत. त्याचबरोबर www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर देखील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. निर्मात्यांनी परिपूर्ण अर्ज भरून महामंडळाकडे विहित मुदतीत प्रवेशिका सादर करायच्या आहेत.

- जनसंपर्क विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी




## गौतम वानखडे यांची कामाची दखल ! पत्रकार व विक्रम गांवडे यांच्या कडून सत्कार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर :** राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंती चे औचित्य साधुन गौतम वानखडे ह्याचा सत्कार आशादीप महिला आधार मंच, मुंबई आणि प्रिय दर्शिनी फाऊंडेशन यांच्या वतीने वसंत नाईक सभागृह, नौपाडा ठाणे(प) येथे पद्मश्री मा.तात्या लहाने यांच्या शुभ हस्ते गौतम वानखेड़े यांना राज्य स्तरीय सत्यमेव जयते पुरस्कार २०२४ देऊन , त्यांनी केलेल्या समाजकार्याचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्रातील विदर्भ भागात होतकरु गरीब विद्यार्थी तसेच इतर युवकांना , समाजातील नागरिकांना गेल्या ३० वर्षांपासुन ते आजतायगत सामाजिक आणि धार्मिक कामात निःस्वार्थ पणे मदत करत आहेत. संपुर्ण विदर्भ विभागातुन त्यांची या पुरस्करा करीता निवड झाली होती.तसेच पालघर मधील युवा इंजी.विक्रम गावंडे यांनी व पत्रकार बंधु समवेत पालघर येथे सुद्धा त्यांचे पुष्पगुच्छ व विदर्भचा पेहराव भेट देऊन पुढील वाटचली करीता शुभेच्छा देण्यात आल्या.

## सोळा वर्षापासून कल्याण पूर्वेत साजरा होतोय नमन गरबा रास

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण पूर्व साईबाबा नगर येथे, साईकृपा ट्रस्ट. डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि निलेश शिंदे फाउंडेशन यांच्या विद्यमानाने स्त्री शक्तीचा जागर कल्याण पूर्व येथे ३२०००चौरस मीटर आयोजित मंडपात आयोजित केला आहे. पोलीस यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ठेवलेली आहे नऊ दिवस समाजात सर्व स्तरावर सेवेत काम करणाऱ्या शक्तीचा सन्मान केला जाणार आहे. साधारण दहा ते सात हजार दांडिया रसिक येथे येणारे आहे. असे शिवसेनेचे पदाधिकारी आणि आयोजकांनी पत्रकारांना सांगितले आहे. या कार्यक्रमात अरुण आशान उपजिल्हाप्रमुख प्रशांत काळे शिवसेना संपर्कप्रमुख सीपी मिश्रा शिवसेना उत्तर भारतीय विभाग शहर प्रमुख शिवराज ग्रुपचे संचालक संतोष सावंत उपजिल्हाप्रमुख जितेंद्र शिर्के उपस्थित होते.

## सरपंच व पोलीस पाटील हे गावस्तरावरील विश्वासू घटक - संदीपान सोनवणे!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर :** झिडके-अंबाडी : नवरात्र महोत्सव व आगामी काळात येणारी विधानसभेची निवडणूक या दृष्टीकोनातून भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात कोणताही अनुचित प्रकार घडू नये,याची खबरदार घेण्यासाठी गणेशपुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ' ज्ञानेश्वर मंदीर झिडके अंबाडी नाका ' येथे बुधवार दिनांक-०२/१०/२०२४ रोजी संध्याकाळी ०५ ते ०७ या वेळेत गणेशपुरी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील सरपंच व पोलीस पाटील यांच्या सभेचे खासकरून आयोजन करण्यात आले होते.यावेळेस जवळपास १०० महिला- पुरूष सरपंच व पोलीस पाटील यांची उपस्थिती होती.

सदर सभेत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी सरपंच व पोलीस पाटील यांना अगदी जाणीवपूर्वक सांगितले की,गावस्तरावर आपण मंडळी अत्यंत विश्वासू घटक असल्यामुळेच सध्या सुरू होणारा नवरात्र महोत्सव व आगामी काळात येणारी विधानसभेची निवडणूक याबाबत आपापल्या गावात कायदा, सुव्यवस्था काटेकोरपणे पालन करीत असताना, आचारसंहिता या महत्वपूर्ण कायद्याचेही पालन करून,पोलीसांना सहकार्य करावे.अशी सदिच्छा या वेळेस व्यक्त केली.त्याचबरोबर प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत गुन्हेगारी अथवा चोऱ्या रोखण्याकरिता सी.सी.कॅमेरे बसविण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीने लवकरात- लवकर करावी,तसेच झिडके-अंबाडी नाका हा गणेशपुरी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील महत्वाचे असे ठिकाण असल्यामुळेच या ठिकाणी भाजीपाला,फळविक्रेते,व इतर व्यवसायिक तसेच रिक्षाचालक, मिनीडोअर चालक यांच्याबाबतीत झिडके-अंबाडी ग्रामपंचायतीकडून योग्य ती कारवाई करण्यात यावी, भविष्यात नाक्याच्या मध्यभागी अपघाताने जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीवर राहील अशी स्पष्ट सुचना यावेळेस करण्यात आली.

सदर सभेत पोलीस उपनिरीक्षक श्री.राऊत हेही उपस्थित होते.

## भातसा कालवा उपचारीचे रस्त्यात रुपांतर केल्यास तीव्र आंदोलन! - शिंदे गटाचा इशारा





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामिण प्रतिनिधी**

भातसा उजव्या कालव्याला असलेल्या कासणे-पाली येथील कालव्याच्या वितरेकी (उपचारी) बंद करून याठिकाणी रस्ता बनवून देण्याचा घाट भातसा कालवा विभागांनी घातला असून या उपचारीचा रस्त्यात रुपांतर केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना (शिंदे गट) उपतालुकाप्रमुख भगवान भोईर यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

गेल्या पस्तीस चाळीस वर्षांपूर्वी सदर भातसा उजव्या कालव्यातून कासणे, पाली, सारमाळ आदी गांव-पाड्यां साठी सदरची वितरिका (उपचारी) शेतकऱ्यांना सिंचनाकरीता भुसंपादीत करण्यात आली आहे. या वितरिकेत अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झालेल्या आहेत. परंतु आजपर्यंत भातशेती व भाजीपाला लागवड साठी पाणी तसेच काही शेतकऱ्यांना मोबदला देखील मिळाला नाही त्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांना पाणी मिळावे अशी मागणी असताना दुसरीकडे संबंधित विभागाने विकासकांना रस्ता व्हावा यासाठी प्रयत्न सुरू केले असल्याचे भोईर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, वितरिकेच्या लगत असलेल्या रस्त्याचा वापर करून ही वितरिका (उपचारी) बुजवून त्या ठिकाणी रस्ता करण्याचा घाट घातला असून या उपचारीचा रस्त्यात रुपांतर करु नये अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा भगवान भोईर यांनी तहसीलदार व भातसा कालवा विभागाला दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

> **“ सदर, शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी संपादित झालेल्या या वितरिकेद्वारे पाणी सोडण्यात यावे अशी मागणी यापूर्वी केलेली आहे परंतु आजमितीला या उपचारीचा सिंचनासाठी वापर न केल्यामुळे येथील शेतकरी वंचित राहिले आहेत. - बाळाराम तरणे (शेतकरी, पाली)**

> **“ सदर याठिकाणी उपचारी (वितरिकेच) हद्द निश्चित म्हणून हद्द सिमांकन कामी हद्दमार्क कार्यवाही करण्यात येत आहे. - पी.जे.ढोकणे (उप अभियंता, भातसा कालवा विभाग, शहापूर)**

## मुरबाड मध्ये नवरात्रौत्सवास प्रारंभ

### दुर्गामातेच्या ५१३ मूर्तीची पारंपारिक पद्धतीने प्रतिष्ठापना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुरबाड दि.३: मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात नवरात्रौत्सव निमित्त विविध प्रकारे नवरात्रौत्सव साजरा करण्यात येत असतो त्याच धरतीवर गुरूवारी सकाळी नऊ ते दुपारी बारा वाजेपर्यंत वाजत गाजत तसेच ढोल ताशांच्या गजरात मुरबाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळाच्या ९१ दुर्गामातेच्या मूर्ती तर खाजगी २८४ तर टोकवाडे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळाच्या ३८ तर खाजगी १०० दुर्गामातेच्या असे मिळून ५१३ मूर्तीची पारंपारिक पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. नवरात्रौत्सव निमित्त मुरबाड व टोकावडे पोलीस ठाण्याच्या वतीने कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती दोन्ही पोलीस ठाण्याच्या सूत्रांनी दिली आहे.


दैनिक जीवनदीप वार्ता

**नवरात्री निमित्त विशेष आवाहन**



नवरात्र हा एक असा कालखंड आहे ज्या कालखंडातील सर्व नऊ दिवसांपैकी प्रत्येक दिवस हा आपण देवीमातेच्या नऊ वेगवेगळया अवतार तसेच रुपांना अर्पित करत असतो. हा उत्सव साजरा करताना आपण प्रत्येक दिवशी जो रंग महत्वाचा त्याच रंगाचे वस्त्र, कपडे परिधान करतो. आपणही असेच रंग परिधान करुन नवरंगात रंगला असाल तर आपल्या ग्रुपचे फोटो नाव व पत्त्यासह दै. जीवनदीप वार्ताच्या खालील ई मेल आयडीवर पाठवावेत आम्ही त्यास नक्कीच प्रसिध्दी देऊ

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com



'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी